**'प्रेस नोट'** दिनांक:- ०९/०९/२०२६

**अभिलेखावरील सराईत आरोपीस अटक करुन मोबाईल चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस आणुन त्याचेकडुन एकूण १,४८,०००/- रू किंमतीचे ०९ मोबाईल हस्तगत केलेबाबत ...**

---

पार्कसाईट पोलीस ठाणे येथे दि.०८/०९/२०२६ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गु.र.क्र ८७३/२०२६, कलम ३०५ (अ) भा.न्या.सं २०२३ अन्वये उघडया घरात प्रवेश करून मोबाईल चोरी केलेबाबत गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलीसांनी सदरचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला होता. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/नितीन झाडे व पथकाने गुन्हयाचे घटनास्थळ व त्या परिसरातील सी. सी.टी.व्ही. फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयातील पाहिजे आरोपींचा मागोवा काढुन ०५ तासात पोलीस अभिलेखावरील आरोपी नामे **फिरोज मो. शकील शेख उर्फ चुहा** मु/२५ वर्षे, रा. ठी. अंबिका नगर चाळ, अजवा हॉटेल मागे, अप्पर डेपो पाडा, पार्कसाईट, विक्रोळी (प), मुंबई ७९ यांस अटक करुन १) गु.र.क्र. ८७३/२०२६ कलम ३०५ (अ) भा.न्या.सं. २) गु.र.क्र. ८७९/२०२६ कलम ३०५ (अ) भा.न्या. सं. ३) गु.र.क्र. ८८०/२०२६ कलम ३०५ (अ) भा.न्या.सं. हे ०३ गुन्हे उघडकीस आणले. तसेच सदर आरोपीताकडे कौशल्यापुर्व तपास करून रुपये १,४८,०००/- रू किंमतीचे ०९ मोबाईल हस्तगत करण्यात आले.

अटक आरोपी नामे **फिरोज मोहम्मद शकिल शेख उर्फ चुहा**, वय २५ वर्षे, याचे वर पार्कसाईट, घाटकोपर, पंतनगर आणि निर्मलनगर या पोलीस ठाणेस जबरचोरी, चोरी, घरफोडी, अवैध शस्त्र बाळगणे असे एकुण २० गुन्हे यापुर्वी दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री. देवन भारती, पोलीस आयुक्त सो, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. मनोज शर्मा, पोलीस सहआयुक्त (का व सु), श्री. अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई, श्री. अभयसिंह देशमुख, पोलीस उपआयुक्त, पुर्व परिमंडळ- ०३, मुलूंड, मुंबई, श्रीमती प्राची कर्णे, सहाय्यक पोलीस आयुक्त, विक्रोळी विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पार्कसाईट पोलीस ठाणे, मुंबई, श्री. अशोक लांडगे, सहा. पोलीस निरीक्षक नितीन झाडे, पोलीस उप निरीक्षक अक्षय वाघ, पोह/विशाल गवारे, पोह/राहुल नवले, पोशि/मनोज सुरवाडे, पोशि/रोहिदास भुसारी, पोशि/दिपक तायडे यांनी सदरची कामगिरी केली आहे.

---